दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.१२ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ८२ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | wednesday 12 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 82 | Pages 4 | Rate 4 Rs

## जनतेच्या पाठिशी उभे राहणे आपले कर्तव्य

**मुंबई–** उद्धव ठाकरे म्हणाले, कुंडलिक खाडे मघाशी म्हणाले की एका म्यानीत दोन तलवारी राहू शकत नाहीत. आत्ता मला तुम्ही एक तलवार काय आहात हे पाहायचे आहे. या तलवारीची ताकद किती आहे व तिला किती धार लागली आहे हे मला दाखवून द्या. आपण गोपीनाथ मुंडे यांच्यावरील प्रेमापोटी आतापर्यंत बीड जिल्ह्यात भाजपला झुकते माप दिले. पण आता बीड जिल्ह्याची पूर्णतः विल्हेवाट लागली आहे. तिकडे कुणीच कुणाचे नाही. अशावेळी सर्वसामान्य जनतेच्या पाठिशी उभे राहणे हे आपले कर्तव्य आहे. जनतेकडूनही आपल्याला मोठी अपेक्षा आहे. शिवसेना मला पूर्वीपेक्षा जास्त वैभवशाली पाहिजेच. याचा अर्थ जनता आपल्यासोबत आली पाहिजे.

# काँग्रेस कोणत्याही स्थितीत मनसेसोबत जाणार नाही-बाळासाहेब थोरात यांची स्पष्टोक्ती

## काँग्रेसचा मनसेसोबत आघाडी करण्यास ठाम नकार

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आगामी मुंबई महापालिका तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. अशातच काँग्रेसकडून मोठा राजकीय संदेश देण्यात आला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबई महापालिका स्वबळावर लढण्याची घोषणा केल्यानंतर, आता काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनीही स्पष्ट भूमिका मांडली आहे. काँग्रेस कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसोबत जाणार नाही, असे थोरात यांनी ठामपणे सांगितले. त्यामुळे मनसेसोबत संभाव्य आघाडीच्या चर्चेला पूर्णविराम लागल्याचं स्पष्ट दिसत आहे.नाशिक येथे काँग्रेसच्या शिष्टमंडळाने बाळासाहेब थोरात यांची भेट घेतली. यावेळी, संगमनेर येथील त्यांच्या कार्यालयात बंद दाराआड चर्चा झाली. या बैठकीत थोरात यांनी कार्यकर्त्यांशी मनमोकळ्या गप्पा मारत अनेक गैरसमज दूर केले. मी नगर आणि नाशिक वेगळं मानत नाही, त्यामुळे कार्यकर्ते माझ्याकडे येत असतात. नाशिक येथे झालेल्या बैठकीत सीपीआयच्या प्रतिनिधींनी मला आमंत्रण दिलं होतं. तिथे कोण कोण उपस्थित राहणार आहे, हे मला माहीत नव्हतं, असं स्पष्टीकरण त्यांनी दिलं. माध्यमांमध्ये झालेल्या चर्चेबद्दल बोलताना त्यांनी म्हटलं की, मीडियाने वेगळा अर्थ लावू नये. हर्षवर्धन सपकाळ हे आमचे प्रांत अध्यक्ष आहेत, आम्ही नेहमीच एकत्र काम केलं आहे आणि पुढेही करत राहू.बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट सांगितलं की, काँग्रेसचा निर्णय ठाम आहे, मनसेबरोबर कोणतीही आघाडी होणार नाही. त्यांच्या या वक्तव्याने काँग्रेसची निवडणूक रणनीती अधिक स्पष्ट झाली आहे. गेल्या काही दिवसांत मनसे आणि काँग्रेसच्या संभाव्य सहकार्याबाबत अफवा पसरल्या होत्या. मात्र, थोरात यांच्या भूमिकेमुळे या सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. काँग्रेस मुंबई महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार असल्याचं संकेत आता अधिक ठळकपणे मिळत आहेत.

दरम्यान, कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड येथे दोन राष्ट्रवादी काँग्रेसचे गट एकत्र आल्याबद्दल विचारले असता, बाळासाहेब थोरात यांनी संयमी प्रतिक्रिया दिली. जो राष्ट्रहिताचा विचार करतो, तो भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करेल. त्यामुळे जर ते असं करत असतील, तर आमचं काही म्हणणं नाही, असं त्यांनी म्हटलं. त्यांच्या या विधानातून त्यांनी थेट टीका न करता सूचक संदेश दिला आहे. राज्यात भाजपविरोधी आघाडीसाठी काही प्रमाणात विचार सुरू असल्याचं त्यांनी कबूल केलं, पण काँग्रेसचा सहभाग मर्यादित राहील, हेही स्पष्ट केलं.राज्यातील राजकीय वातावरण सध्या अत्यंत चुरशीचं बनलं आहे. काँग्रेसकडून मनसेसोबतच्या आघाडीला नकार दिल्यानंतर, मनसेची पुढील भूमिका काय असणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. दुसरीकडे, काँग्रेस स्थानिक निवडणुकांसाठी स्वतंत्र तयारी करत असून, कार्यकर्त्यांना एकसंघ ठेवण्यावर वरिष्ठ नेते भर देत आहेत. बाळासाहेब थोरात यांचे हे वक्तव्य काँग्रेसच्या स्वबळावर लढण्याच्या धोरणाला बळकटी देणार आहे. त्यामुळे आगामी निवडणुका अधिक रंगतदार आणि रोचक होणार यात शंका नाही.



# आम आदमी पार्टीचा ए-फॉर्म जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल

## मा.अश्विन जी नलबले सह प्रभारी मराठवाडा आम आदमी पार्टी

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

आम आदमी पार्टीच्या वतीने बीड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद निवडणुका स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, आम आदमी पार्टीचे मराठवाडा सहप्रभारी मा. अश्विनजी नलबले यांनी बीड येथे येऊन जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक विभागात स्वतः उपस्थित राहून ए-फॉर्म दाखल केला.

या वेळी आम आदमी पार्टी बीड जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे व शहरप्रमुख सय्यद सादेक उपस्थित होते. फॉर्म दाखल झाल्यानंतर त्याची प्रत जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

या प्रसंगी श्री. अश्विन नलबले यांनी सांगितले की, आम आदमी पार्टी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका जोमाने लढणार असून, कोणत्याही प्रकारची अडचण आली तर आम्ही ती सोडविण्यासाठी सदैव तत्पर आहोत. त्यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवत चांगले मार्गदर्शन केले आणि त्यानंतर धाराशिव व लातूर दौऱ्यावर प्रस्थान केले..



# बाबासाहेबांचे जीवन समजून घेतल्यास प्रत्येकात समाज बदलण्याची ताकद-ओहोळ

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बाबासाहेबांचे जगणं म्हणजे संघर्ष, शिक्षण आणि परिवर्तनाचा प्रवास. प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचे जगणं समजून घेत तो आपल्या जीवनात उतरवला, तर समाज बदलण्याची ताकद प्रत्येकात निर्माण होईल, असा भावस्पर्शी संदेश प्रसिद्ध लेखक आणि विचारवंत जगदीश ओहोळ यांनी दिला.हा संदेश त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित विशेष व्याख्यानात दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, तर प्रमुख अतिथी म्हणून उमेश सोनवणे, प्रा. राम गायकवाड, प्रा. प्रदीप गाडे आणि मा. भारत मगर उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विचारप्रवर्तक मतं मांडत समाजपरिवर्तनात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.ओहोळ यांनी सांगितले की, भारतातून शिक्षणासाठी अमेरिकेत गेलेला विद्यार्थी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. कोलंबिया विद्यापीठातील लायब्ररी उघडताना पहिला उभा राहणारा आणि ती बंद होईपर्यंत अभ्यास करणारा शेवटचा विद्यार्थी म्हणजे आंबेडकर. हा चिकाटीचा, परिश्रमाचा आणि शहाणपणाचा आदर्श प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मसात करावा. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले की, बाबासाहेबांनी जसे विचार, कृती आणि शिक्षणाद्वारे जग बदलले, तसेच प्रत्येकाने त्यांचे जीवन आत्मसात केले, तर समाज बदलण्याची क्षमता प्रत्येकामध्ये निर्माण



होऊ शकते.दरम्यान, नालंदा फाउंडेशन, बीड यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शिक्षक वक्तृत्व स्पर्धा ९ नोव्हेंबर २०२५ रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात पार पडली. राज्यातील विविध जिल्ह्यांतील शिक्षकांनी उत्साहपूर्वक सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्यांना मुख्य वक्ते मा. जगदीश ओहोळ यांच्या हस्ते पारितोषिके व प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली. प्रथम क्रमांक: रायगडचे प्रेमनाथ पाटील (२५,०००), द्वितीय क्रमांक: बीडचे श्रीराम जाधव (१५,०००) तृतीय क्रमांक: बीडचे कैलास तुपे (१०,०००) सर्व विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांनी व्याख्यान व स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानले आणि विद्यार्थ्यांना आवाहन केले की, जीवनात यश मिळवण्यासाठी कठीण परिश्रम आणि शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही, असे नमूद केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विकास वाघमारे, सूत्रसंचालन प्रा. अंकुश कोरडे, तर आभार प्रदर्शन प्रा.विद्या अवघडे यांनी मानले. तुलसी शैक्षणिक समूहातील प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिकांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# माजलगाव नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन सेनेच्या बैठकीला इच्छुक उमेदवारांनी उपस्थित राहावे-साळवे

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

माजलगाव नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन सेनेची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत नगरपरिषदेच्या १,२, ४,१२,१३ या प्रभागांतील इच्छुक उमेदवारांनी बुधवार दिनांक १२ रोजी सकाळी ठिक ११ वाजता शहरातील व्यंकटेश हॉटेल मध्ये उपस्थित राहण्याचे आवाहन रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष विजय दादा साळवे यांनी केले आहे. या बैठकीत पक्षाचे आगामी निवडणूक धोरण, उमेदवार निवड प्रक्रिया, तसेच जनसंपर्क मोहिमेचा आराखडा यावर सविस्तर चर्चा होणार आहे. रिपब्लिकन सेनेच्या विचारसरणीवर आधारित संघटित आणि प्रभावी पद्धतीने निवडणुकीचा सामना करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात येईल. बैठकीस सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहनही विजय साळवे यांनी केले आहे.



# जादूटोण्याच्या संशयातून नंदुरबार हादरले!

## वृद्ध महिलेची धारदार हत्याराने हत्या; आरोपी महिलेचा खुनी संशय


दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यात जादूटोण्याच्या (अंधश्रद्धेच्या) संशयातून एका हृदयद्रावक घटनेत ६५ वर्षीय वृद्ध महिलेची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. मोडलगाव येथील काल्ली ओल्या तडवी (वय ६५) या मयत महिलेचा खून झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी म्हसावद पोलीस ठाण्यात एका महिलेविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मोडलगाव गुंबालहोजळ्यापाडा येथे शुक्रवार रात्री १ वाजल्यापासून शनिवार सकाळी ८ वाजेदरम्यान ही घटना घडली.

आरोपी समका नारसिंग पाडवी (राहणार मोडलगाव) हिने मयत कल्ली ओल्या तडवी (वय ६५) या जादूटोणा करतात, असा संशय घेतला होता. याच संशयावरून आपल्याला सतत



आजारपण येत असल्याचा ठाम विश्वास आरोपी समका पाडवी हिचा होता. याच कारणावरून आरोपी महिलेने धारदार हत्याराने वार करून काल्ली तडवी यांची त्यांच्या राहत्या घरात हत्या केली. फिर्यादी भिमसिंग हांद्या वसावे यांच्या तक्रारीवरून म्हसावद पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१) (भारतीय न्याय संहिता २०१३) नुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेची माहिती मिळताच जिल्हा नियंत्रण कक्षास कळविण्यात आले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नंदुरबारचे अपर पोलीस अधीक्षक आणि शहादा भागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सध्या सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन कामे हे गुन्ह्याचा तपास करत आहेत. आरोपी महिलेला अद्याप अटक झालेली नसून, पोलीस तिचा शोध घेत आहेत.घटनेनंतर गावात शांतता असून, पोलिसांनी परिसरातील अंधश्रद्धा आणि जादूटोण्याच्या प्रकरणांबाबत जनजागृती करण्याचे आवाहन केले आहे.



संपादकीय

# शिष्यवृत्तीची इयत्ता कोणती?



राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षांची इयत्ता पुन्हा बदलण्याचा निर्णय, आपल्या शिक्षण व्यवस्थेतील धोरणसातत्याचा अभाव अधोरेखित करणारा आहे. संबंधित मंत्री आणि अधिकारी यांच्या मनात आल्यानंतर त्यांनी निर्णय घ्यावा आणि लाखो विद्यार्थ्यांच्या तो माथी मारावा, हा प्रकार काही नवीन नाही; परंतु शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात निर्णय घेताना विद्यार्थ्यांचा आधी विचार करावा, असे सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी सांगूनही त्याचा संबंधितांवर फारसा परिणाम होत नाही, हेच खरे. मूळचा निर्णय बदलून नवा आदेश जारी करायचा आणि तद्नंतर पुन्हा मूळचा निर्णय लागू करायचा, असा प्रकार शिक्षणाबाबत सातत्याने होत आहे.दहावीच्या परीक्षेत अंतर्गत गुण रद्द करणे आणि पुन्हा लागू करणे, शालेय पाठ्यपुस्तकात कोरी पाने ठेवणे आणि ते नंतर काढून टाकणे, अशा निर्णय फिरविणाऱ्या अनेक घटनांची मालिकाच गेल्या काही वर्षांत दिसते. यातून आपल्या शिक्षणविषयक धोरणातील धरसोडपणा, लहरीपणा दिसतो. याचा विद्यार्थ्यांवर मोठा परिणामही होतो; मात्र शिक्षणाच्या केंद्रस्थानी असलेल्या या घटकाचा विचार फारसा होत नाही. विद्यार्थी हा केवळ भाषणांपुरता शिक्षणाच्या केंद्रस्थानी असतो. नवे निर्णय घेतले जाऊ नयेत किंवा आधीची व्यवस्था बदलली जाऊ नये, असा याचा अर्थ नाही. मात्र, कोणताही निर्णय घेण्याच्या आधी त्याच्या शैक्षणिक गुणवत्तेचा, त्यामागील हेतूंचा आणि विद्यार्थ्यांवरील परिणामाचा अभ्यास करायला हवा. आधीची एखादी पद्धत बंद करतानाही अशाच प्रकारे अभ्यास व्हायला हवा.सध्या पाचवी आणि आठवी या इयत्तांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. नव्या निर्णयानुसार, यंदाच्याच शैक्षणिक वर्षापासून चौथी आणि सातवी या इयत्तांसाठी ही परीक्षा घेतली जाईल. वास्तविक अशा प्रकारचे निर्णय शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला जाहीर होणे अपेक्षित असते. म्हणजे त्यानुसार विद्यार्थ्यांना तयारी करता येऊ शकते. शिष्यवृत्तीच्या इयत्ता बदलण्याचा निर्णय मात्र चालू शैक्षणिक वर्षाच्या मध्यात जाहीर करण्यात आला आहे.पाचवी आणि सातवी या वर्गांतील शिष्यवृत्ती देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना या परीक्षेची कल्पना होती. त्यांपैकी काहींनी त्यांचा अभ्यासही सुरू केला असेल. मात्र, चौथी आणि सातवी या इयत्तांतील शिष्यवृत्ती परीक्षा देऊ इच्छिणारे, आपल्यासाठी ही परीक्षा पुढील वर्षी असणार या समजुतीत असणार. त्यांना ही परीक्षा आता याच शैक्षणिक वर्षात द्यावी लागणार. त्यामुळे साहजिकच त्यांना तयारीसाठी वेळ कमी मिळणार. विद्यार्थी हाच शिक्षणाचा केंद्रबिंदू असेल, तर हा निर्णय शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला का जाहीर केला नाही, हा प्रश्न म्हणूनच महत्त्वाचा ठरतो. शिष्यवृत्तीसाठी इयत्ता बदलण्याचा हा निर्णय कोणत्या समितीच्या शिफारशीनंतर करण्यात आला, ही समिती कधी नेमली गेली होती, किंवा यासाठी कोणता अभ्यास केला गेला, असे प्रश्न निर्माण होतात. शिक्षण खात्याने या प्रश्नांची उत्तरे द्यायला हवीत. इयत्ता बदल करण्यामागील कारणमीमांसा होणे गरजेचे आहे.वास्तविक, दहा वर्षांपूर्वीपर्यंत चौथी आणि सातवी याच इयत्तांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा होत. त्या वेळी राज्यभरातून सुमारे २२ लाख विद्यार्थी या परीक्षा देत. ही परीक्षा सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक नसली, तरी आपल्या विद्यार्थ्यांनी ती द्यावी यासाठी शाळा प्रयत्नशील असत. विशेषत: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा यासाठी अधिक पुढाकार घेत. स्पर्धा परीक्षांच्या आजच्या काळात शिष्यवृत्ती परीक्षांकडे त्यांची प्राथमिक पायरी म्हणूनही पाहिले जात असे. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर प्राथमिक स्तर पाचवीपर्यंत आणि उच्च प्राथमिक स्तर आठवीपर्यंत वाढविण्यात आला. त्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षा चौथी आणि सातवी यांऐवजी पाचवी आणि आठवी या इयत्तांना घेण्याचा निर्णय झाला. त्यानंतर मात्र या परीक्षांभोवती असलेले वलय कमी होत गेले. या परीक्षा देणाऱ्यांची संख्याही रोडावत गेली. परीक्षार्थींची संख्या सहा ते सात लाखांपर्यंत खाली गेली.आपल्याकडील अनेक प्राथमिक शाळा चौथीपर्यंतच असल्याने अन् खासगी शाळांत शिष्यवृत्ती परीक्षांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने विद्यार्थ्यांची संख्या कमी होत गेल्याचे सांगण्यात येते. ती पुन्हा वाढवावी यासाठी पूर्वीप्रमाणे चौथी आणि सातवी या इयत्तांसाठी परीक्षा घेण्याचा निर्णय झाल्याचे सांगण्यात येत आहे. व्यवस्थित अभ्यास करून शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला तो जाहीर केला असता, तर विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या शिक्षकांना व पालकांना व्यवस्थित नियोजन करता आले असते. यापुढे तरी असे होणार नाही, याची काळजी घ्यायला हवी

# अचानक वादग्रस्त जमीन व्यवहार रद्द करणे म्हणजेच भ्रष्टाचाराला खतपाणी घालने

**दैनिक राज आनंद । वृत्तसेवा**

वादग्रस्त व्यवहार रद्द करून भ्रष्टाचार लपणार आहे काय?हे तर असे झाले एखाद्याचा जीव गेला आणि त्याला जादुच्या कांडीने जिवंत केले!भ्रष्टाचार अंगलट येताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपला पवित्रा बदलविला आणि पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया एंटरप्राईजेस एलएलपी कंपनीने खरेदी केलेल्या पुण्यातील मुंढवा -कोरेगाव पार्क येथील ४० एकर महार वतन जमिनीचा वादग्रस्त व्यवहार अखेर रद्द करण्यात आला आहे.अजित पवार यांनी स्वतः याची माहिती देताना सांगितले की,हा व्यवहार रद्द झाला आहे.हा व्यवहार रद्द केला याचे स्वागतच,परंतु पार्थ पवारवर ताबडतोब कठोर कारवाई का नाही? व्यवहार रद्द म्हणजे पार्थ पवार यांना क्लीन चिट हे सिद्ध झाले आहे.ही कसली समाज सेवा आणि हे कसले लोकप्रतिनिधी. सर्वसाधारण गुन्हेगारांनी थोडासाही गुन्हा केला तर त्याला जेलमध्ये डांबुन ठेवल्या जाते आणि १८०० करोडची जमिन ३०० करोडमध्ये घेणारा पार्थ पवार त्यांच्यावर काहीही कठोर कारवाई न करता त्यांचे वडील झालेला व्यवहार रद्द करतात म्हणजेच राज्यात असलेल्या सरकारमधील राजकीय पुढारी राज्याला आपली स्वतःची मालमत्ता समजतात की काय असे स्पष्ट दिसत आहे.हा कसला न्याय, व्यवहार रद्द करणे म्हणजे भ्रष्टाचाराला खुली चालना देणे हे यावरून सिद्ध होते. अजित पवारांनी पुर्वी सिंचन घोटाळा केला होता,आता पार्थचा घोटाळा हे राज्यात चाल्लय तरी काय?सध्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार विरोधात असतांना ७० हजार कोटींचा सिंचन घोटाळा उघडकीस आला होता.परंतु सत्तेत येताक्षणी त्यांचे संपूर्ण घोटाळे निरर्थक ठरले व संपूर्ण घोटाळ्यातुन मुक्त होऊन त्यांना क्लिनचीट मिळाली.तसेच पार्थ पवारांचे सुध्दा होईल.कारण पार्थ पवारांनी कितीही घोटाळा केला असेल तरी त्यांच्या केसालाही धक्का लागणार नाही हेही तितकेच सत्य आहे.परंतु यात मात्र सरकारी अधिकारी, कर्मचारी किंवा कंपनीच्या विरोधात मात्र गुन्हे दाखल करून यांची उचलबांगडी जरूर दिसून येईल.कारण गेल्या विस वर्षाच्या काळात राज्यासह देशातील ९५ टक्के आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांनी भ्रष्टाचाराच्या संपूर्ण हद्दी पार केल्या व करोडोंची संपत्ती जमा केली.तेव्हाच त्यांच्या जवळ व त्यांच्या परिवाराजवळ करोडोंची संपत्ती, आलेशान गाडी , बंगला, फार्महाऊस दिसून येते.अशानी खरोखरच राज्याचा किंवा देशाचा विकास होईल का?व शेतकऱ्यांकडे सरकारचे व राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष जाईल का?असा मोठा प्रश्न राज्याच्या १४ कोटी जनतेपुढे उपस्थित होतो.कारण भ्रष्टाचारामध्ये सर्वच राजकीय पक्षांचे ९५ टक्के राजकीय पुढारी पुर्णतः लिप्त आहेत.तरीही राजकीय पुढाऱ्यांवर कोणतीही कठोर कारवाई किंवा शिक्षा अजीबात होतांना दिसत नाही हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. चोर, डाकु,जेबकत्रा,खुनी, बलात्कारी, आतंकवादी यांना थर्ड ग्रेडची सजा दिली जाते. परंतु राजकीय पुढाऱ्यांवर नावापुर्ती कारवाई होते व कालांतराने सरकारकडुन त्यांना क्लिनचीट दिली जाते. ही स्वतंत्र भारताची व लोकशाहीची शोकांतिका म्हणावी लागेल.पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील सुमारे ४० एकर जमीन अमोडिया एंटरप्राईजेसया कंपनीला विकण्यात आली होती.या कंपनीच्या नोंदणीपत्रात भागीदार म्हणून पार्थ पवार यांचा स्पष्ट उल्लेख आहे.महार वतनाची ही जमीन विकण्यास मनाई आहे.तरीही हा व्यवहार पुढे रेटण्यात आला. बाजारभावानुसार जमिनीची किंमत तब्बल १८०० कोटी रुपये असतांना खरेदी व्यवहार फक्त ३०० कोटीत करण्यात आला. या व्यवहारामुळे शासनाची सुमारे १५२ कोटी रुपयाची फसवणूक झाल्याचा आरोप सुध्दा आहे.विशेष म्हणजे या कोट्यवधींच्या व्यवहारासाठी केवळ ५०० रूपये मुद्रांक वसूल करण्यात आले.हे सगळ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुत्रासाठी अवघ्या एका महिन्यात घडवून आणल्याचे सांगितले जाते.महार वतन म्हणजे ब्रिटिश काळात महार समाजाला शासनाची सेवा करण्याच्या बदल्यात वंशपरंपरागत पध्दतीने कसण्यासाठी दिलेली जमीन.या जमिनीवर वतनदारांचे हक्क आहेत.ही जमीन वतनदारांना कसता येते.पण खरेदी-विक्री किंवा हस्तांतरण करता येत नाही.परंतु पार्थ पवार सारखे राजकीय पुढारी यांच्याजवळ कोरोडोंची संपत्ती असून सुद्धा भ्रष्टाचार करून १८०० कोटी रुपयांची जमीन फक्त ३०० कोटी रुपयात घेण्याचा व्यवहार करतात,अशांना तर सरकारने लोकप्रतिनिधी पदावरून ताबडतोब बरखास्त करायला पाहिजे व आजीवन कारावास अशी कठोर सजा व्हायला हवी तेंव्हाच राजकीय पुढाऱ्यांमध्ये बदल घडवून येईल अन्यथा भ्रष्टाचार दिवसेंदिवस वाढतच जाईल आणि यामुळे गरीब व सर्वसामान्यवर्ग गरीबांच्या खाईत गुदमरून मरेल आणि पार्थ पवारांसारखे ९५ टक्के राजकीय पुढारी करोडपती होतांना दिसेल.कारण कायदे बनविणारे हेच राजकीय पुढारी असतात त्यामुळे यांना सजा नाहीच.राज्यासह देशात आपण रोज वोट चोरीच्याबातम्या मिडियाच्या माध्यमातून ऐकत असतो.आता जमिन चोरी सुध्दा सुरू झाल्याचे दिसून येते.यावरून स्पष्ट होते की ९५ टक्के राजकीय पुढारी वाममार्गाने जमिन चोरी, मालमत्ता चोरी, सोना चोरीच्या माध्यमातून करोडपती होतांना दिसतात.या राजकीय पुढाऱ्यांच्या चोऱ्यांमुळे राज्याच्या सर्वसामान्य जनतेला योग्य आरोग्य सुविधा उपलब्ध होत नाही, शेतकऱ्यांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहे, बेरोजगारांची समस्या वाढत आहे, महागाईचा महामेरू उभा आहे यामुळे सर्वसामान्य दिवसेंदिवस हवालदिल होत आहे.आज राज्याचा विचार केला तर राज्यातील ९५ टक्के आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांजवळ एवढी संपत्ती आहे की, त्याची आपण गणना सुध्दा करू शकत नाही.शाळा-महाविद्यालये, कारखाने,शेत जमीन इत्यादीसह अनेक व्यवहार राजकीय पुढाऱ्यांचे आहेत. राजकिय पुढाऱ्यांनी खरोखरच इमानदारी दाखविली असती तर राज्यात मोठे उद्योग उभारू शकते, शेतकऱ्यांचे कर्ज माफ होवू शकते, गरीब व सर्वसामान्यांना चांगल्याप्रकारची आरोग्य सुविधा उपलब्ध करून देता आली असती,बेरोजगारांना रोजगार चांगल्याप्रकारे मिळू शकला असता.परंतु या राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने एवढी संपत्ती जमा करून ठेवली आहे की, त्यांच्या सात पिढ्या बसून खाईल एवढी संपत्ती त्यांच्या जवळ आहे.आपल्या पुर्वजांनी देश सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली व फासावर चढले आणि देश स्वतंत्र केला.परंतु मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी फक्त स्वतःच्या स्वार्थासाठी स्वाहाकाराची भावना जोपासली व राज्यात नवीन नवीन समस्या निर्माण केल्या हाच तो प्रकार पार्थ पवार यांनी केला ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.सरकार कथीत भ्रष्टाचारावर पांघरूण घालण्यासाठी महसूल,मुद्रांक व नोंदणी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.राज्याच्या जनतेला चांगल्याप्रकारे ग्यात आहे की, कोणतीही समिती असो ती सरकारच्या बाजूने असते व प्रकरण दाबण्यासाठी दिखावा असतो.त्यामुळे समिती ही फक्त ढोंग आहे असे मला वाटते.त्यामुळे सरकार जर खरोखरच राज्याच्या जनतेला न्याय देण्यासाठी सक्षम असेल तर त्यांनी पार्थ पवारांवर कठोर कारवाई करावी यातच सरकारची सत्यता आणि खरा न्याय आहे.असे जर झाले तर भ्रष्टाचारावर आळा अवश्य बसेल.जय हिंद.

**-रमेश कृष्णराव लांजेवार**

# डॉ.विद्या कावरे पारनेरच्या नगराध्यक्ष महाविकास आघाडीची बाजी

## खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब;महायुतीचा घोडेबाजार फसला

**दैनिक वादळ वार्ता**
**पारनेर । प्रतिनिधी**

पारनेर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने दमदार विजय मिळवला आहे. आघाडीच्या डॉ. विद्या बाळासाहेब कावरे यांनी ११ विरुद्ध ६ मतांनी विजय संपादन करत नगराध्यक्षपद पटकावले. त्यांच्या विजयाने महायुतीच्या राजकीय घोडेबाजाराला चपराक बसली असून, खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. नगराध्यक्ष नितीन अडसूळ यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशीया यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि. १० नोव्हेंबर) विशेष सभा घेण्यात आली. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर हे पीठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होते. हात वर करून मतदान पद्धतीने झालेल्या या निवडणुकीत डॉ. कावरे यांनी सहज



विजय मिळवला.महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी एकदिलाने मतदान करून पक्षनिष्ठा अबाधित ठेवली. नितीन अडसूळ, जायदा शेख, सुरेखा भालेकर, योगेश मते, भूषण शेलार, प्रियंका औटी, निता औटी, सुप्रिया शिंदे, हिमानी नगरे, विद्या गंधाडे आणि स्वतः डॉ. कावरे यांनी मतदान करून डॉ. कावरे यांचा विजय निश्चित केला.विरोधी उमेदवार अशोक चेडे यांना विजय सदाशीव औटी, युवराज पठारे, निता ठुबे, नवनाथ सोबले आणि कांताबाई ठाणगे या नगरसेवकांचा पाठिंबा मिळाला.महायुतीकडून महाविकास आघाडीच्या नगरसेवकांना 'गळाला लावण्यासाठी' मोठे आर्थिक आमिष दाखवण्यात आले. लाखो रुपयांच्या ऑफर्स देत मतदानावर परिणाम करण्याचे प्रयत्न शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होते. तरीसुद्धा आघाडीचे नगरसेवक ठाम राहिले. राष्ट्रवादी काँग्रेस गटनेते योगेश मते यांनी शनिवारी ९ नगरसेवकांना व्हिप बजावत डॉ. विद्या कावरे यांनाच मतदान करावे असे निर्देश दिले होते. या व्हिपचे काटेकोर पालन करत आघाडीने एकजुटीचा नमुना दाखवला.नगराध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर डॉ. विद्या कावरे यांचा नगरपंचायत सभागृहात सत्कार करण्यात आला. समर्थकांनी फटाके फोडत आनंदोत्सव साजरा केला. महाविकास आघाडीच्या या विजयाने पारनेरच्या राजकारणात नव्या समीकरणांची चाहूल लागली आहे.

खासदार नीलेश लंके यांनी नगरसेवकांच्या निष्ठेचे कौतुक करत म्हटले की, राजकारणात निष्ठा सर्वांत मोठी असते. लाखो रुपयांचे आमिष असतानाही आघाडीचे नगरसेवक डगमगले नाहीत, हीच खरी आमची ताकद आहे. डॉ. विद्या कावरे यांच्या विजयाने आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या विजयाची नांदी झाली आहे.

# राष्ट्रवादीची झिरवाळ यांच्या उपस्थितीमध्ये महत्त्वपूर्ण बैठक

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्या नगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांसोबत आज झालेल्या बैठकीत आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकांच्या तयारीबाबत सविस्तर चर्चा झाली.या बैठकीस माननीय नामदार नरहरी झिरवळ , आमदार काशिनाथ दाते सर, माजी आमदार चंद्रशेखर घुले, माजी आमदार राहुल जगताप, श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, राहुरी साखर कारखान्याचे चेअरमन अरुण तनपुरे, श्री घनश्याम आण्णा शेलार, जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, शहराध्यक्ष संपतराव बारस्कर आणि कार्याध्यक्ष संजय कोळगे यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली.संपूर्ण जिल्ह्यातील पदाधिकारी, महिला जिल्हाध्यक्ष, युवक तालुकाध्यक्ष, सर्व तालुकाध्यक्ष, वेगवेगळ्या सेलचे अध्यक्ष आणि सर्व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

एकजूट, शिस्त आणि संघटन याच जोरावर आगामी निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निश्चितपणे विजय मिळवेल, असा विश्वास या बैठकीत सर्वांनी व्यक्त केला.



# शिर्डीत परिवर्तनाच्या नांदीचा पुरोहितांकडून एल्गार;भावना व्यक्त करणारे पत्र देत शिर्डीकरांना घातली एकवटण्याची साद



**दैनिक वादळ वार्ता । शिर्डी । प्रतिनिधी**

आज सकाळी शिर्डीतील एकेकाळी भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुख प्रवाहातील नेते, तसेच संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक बाबू पुरोहित यांनी आपल्या पुत्र विराट पुरोहित यांच्या सोबत येणाऱ्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आपले मनोगत व्यक्त करणारे पत्र समस्त शिर्डीकरांसाठी प्रसिद्ध केले.बाबू पुरोहित हे अनेक वर्ष संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून कार्यरत राहिले असून त्यांनी जिल्हा कार्यवाह म्हणून जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली आहे. आज त्यांनी आपल्या या पत्राद्वारे शिर्डीतील नागरिकांना सामाजिक, राजकीय आणि विकासात्मक मुद्द्यांवर विचार मांडले. हे मनोगत पत्र त्यांनी शहरातील मारुती मंदिर परिसर व साई कॉम्प्लेक्स येथे व्यापारी वर्ग व नागरिकांमध्ये वाटले.या उपक्रमाद्वारे बाबू पुरोहित यांनी थेट लोकांशी संवाद साधत त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या प्रसंगी त्यांचे पुत्र विराट पुरोहितही उपस्थित होते. शिर्डीतील जनतेत या पत्राबद्दल उत्सुकता व चर्चेला उधाण आले असून, या संवादातून स्थानिक पातळीवर नव्या राजकीय घडामोडींना चालना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावेळी गणेश वाघचौरे, बंडू जाधव, युवराज निम्बाळकर, गणेश मिसाळ, योगेश निकम, योगेश बडे उपस्थित होते.

# युवक काँग्रेसची मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान ‘वर्षा’ बंगल्यावर धडक

## मरीन ड्राईव्हवर रास्ता रोको, गिरगाव चौपाटीवर आंदोलन

## डॉ.संपदा मुंडेंना न्याय देण्याच्या मागणीसाठी युवक काँग्रेस आक्रमक

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

फलटण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी युवक काँग्रेसने मुंबईत आज तीव्र आंदोलन केले. युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान वर्षा बंगल्यावर थेट धडक दिली. नरीमन पॉइंट, मरीन ड्राईव्ह व वर्षा बंगला अशा तीन ठिकाणी युवक काँग्रेसने आंदोलन करून भाजपा महायुती सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करून डॉक्टर संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली.महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस व मुंबई युवक काँग्रेसने आयोजित केलेल्या या आंदोलनात युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदन भानू चिब, युवक काँग्रेसचे प्रभारी मनिष शर्मा, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे, मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्ष झीनत शबरीन, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेश शर्मा, वरिष्ठ प्रवक्ते सचिन सावंत, युवक काँग्रेसचे प्रभारी अजय चिकारा यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

गिरगाव चौपाटी येथून सुरु झालेले आंदोलन थेट वर्षा बंगल्यावर पोहचले. युवक काँग्रेसचे आंदोलन दडपून टाकण्यासाठी सरकारने पोलिसांच्या मदतीने प्रयत्न केला. अनेक कार्यकर्त्यांना चर्नी रोड स्थानकात अडवून ठेवले. गिरगाव चौपाटी भागातही ठिकठिकाणी बॅरिकेटींग करून कार्यकर्त्यांची धरपकड केली. पण आक्रमक कार्यकर्त्यांनी वानखेडे स्टेडियमजवळ मरिन ड्रायव्हवरच रास्ता रोको केला, यामुळे जवळपास अर्धा तास वाहतुक ठप्प झाली होती. पोलिसांनी कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले पण युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तन्वीर अहमद विद्रोही, लातूर जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रविणकुमार बिराजदार आणि नागपूर ग्रामीण जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष मिथिलेश कान्हेरे यांनी मात्र पोलिसांना गुंगारा देऊन वर्षा बंगल्यावर धडक मारली व जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्यासह सर्व नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांना ताब्यात घेतले. डॉ. संपदा मुंडे यांना भाजपाचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर व पोलीसांच्या अनन्वित छळाला कंटाळून आत्महत्या करावी लागली. पोलिसांनी याप्रकरणी दोघांना अटक केली असली तरी यामागचा मुख्य सुत्रधार भाजपाचा माजी खासदार रणजित सिंह नाईक निंबाळकर मात्र अद्याप मोकाटच आहे. मुख्यमंत्र्यांनी तर निंबाळकरांना कोणत्याही चौकशी आधीच क्लिन चिट देऊन टाकली आहे. काँग्रेस पक्षाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. डॉ. संपदा मुंडे यांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुंडे कुटुंबियांना दिली आहे. सरकार चौकशीच्या नावाखाली मुख्य आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे, पण जोपर्यंत संपदा मुंडे यांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत काँग्रेसचा हा लढा सुरुच राहील.



## प्र.केंद्रप्रमुख ज्ञानोबा रेपे यांचा सेवापूर्ती गौरव

# गुरुजींनी दिलेल्या संस्कारामुळे अनेक विद्यार्थी घडले-रमेशराव आडसकर

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मानेवाडी प्राथमिक शाळेचे सहशिक्षक ज्ञानोबा पंढरीनाथ रेपे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा सोमवार रोजी संपन्न झाला.गुरुजींनी दिलेल्या संस्कारामुळेच अनेक विद्यार्थी घडले असे मत रमेशराव आडसकर यांनी व्यक्त केले ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मानेवाडी येथील सेवा गौरव कार्यक्रमात अध्यक्ष पदावरून बोलत होते.



कार्यक्रमाचे अध्यक्ष अंबा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर,प्रमुख पाहुणे माजी उपसभापती ऋषिकेश आडसकर, रंजित भैय्या आडसकर, गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे,सरपंच शशिकांत इंगळे,उपसरपंच दिगंबर वाघमारे,डॉ.हनुमंत सौदागर,सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक बलभीम रेपे,बाबासाहेब शिनगारे, सय्यद हकीम,सदाशिव थोरात,राजेश देशमुख,एम डी शेख,महेश सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलतांना आडसकर म्हणाले की, त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रामाणिक सेवा केली पुढील सेवा पूर्ती नंतरच्या आयुष्या मध्ये पर्यटन करावे, निरोगी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

ऋषिकेश आडसकर म्हणाले की,रेपे गुरुजींनी चांगले विद्यार्थी घडवले, चांगली सेवा दिली म्हणून त्यांची मुले डॉक्टर, इंजिनिअर घडली असे मत व्यक्त केले.शिक्षक हा समाजाचा आधारस्तंभ आहे.त्यांनी घडवलेले अनेक विद्यार्थी देशासाठी योगदान देतील असे मत व्यक्त केले.डॉ.हनुमंत सौदागर म्हणाले की, शिक्षकांच्या जीवनात सेवापुर्तीनंतर विद्यार्थ्यांच्या आठवणी विसरता येत नाहीत. यापुढे सामाजिक कार्यात झोकून देऊन सेवा करावी असे मत व्यक्त केले. गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे म्हणाले रेपे यांनी आदर्श शिक्षकासारखे काम केले असे मत व्यक्त केले.यावेळी केंद्राच्या वतीने ज्ञानोबा रेपे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या.कार्यक्रम यशस्वीतेसाठी केंद्रीय मुख्याध्यापक सुनील वैरागे,मुख्याध्यापक युवराज हिरवे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष लक्ष्मण माने, पवन माने आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी पालक शिक्षण प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोटरीच्या व्यावसायिक पुरस्कार सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद




दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

'ऑनरिंग अवर अनसंग हिरोज' या व्होकेशनल पुरस्कार सोहळ्याचे आयोजन नुकतेच यशवंतराव चव्हाण सेंटर येथे करण्यात आले होते. ४०० हून अधिक उपस्थितांनी एकत्र येऊन इतरांच्या सेवेसाठी आपले जीवन समर्पित केलेल्या व्यक्तींच्या निस्वार्थ प्रयत्नांना साजरे करण्यासाठी एक भव्य यश मिळाले. या कार्यक्रमात ४० हून अधिक रोटरी अध्यक्षांचा प्रभावशाली सहभाग दिसला, ज्यांनी या गायक नायकांचा सन्मान केला. या नायकांनी, अनेकदा पडद्यामागे काम करून, त्यांच्या समुदायांवर खोलवर प्रभाव पाडला आहे आणि त्यांच्या निःस्वार्थ आणि समर्पणाच्या कथांनी उपस्थित सर्वांवर कायमची छाप सोडली आहे.रोटरीने अलीकडेच रोटरी सेवा सप्ताहात त्यांचे प्रयत्न समर्पित केले, जिथे प्रत्येक दिवशी मुंबईभर रक्तदान मोहीम, ज्येष्ठ नागरिकांचे उपक्रम, नेत्रशिबिरे, आरोग्य शिबिरे, पर्यावरणीय उपक्रम आणि साक्षरता कार्यक्रम यासह विविध प्रकल्प समोर आणले जातात, जे समाजाची सेवा करण्याची क्लबची बांधिलकी जपतात अशा लोकांचा सन्मान करण्यात आला.रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर (३१४१), डॉ. मनीष मोटवानी यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला शोभा आली. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी आणि उपस्थितीने या प्रसंगी खूप मोलाची भर घातली आणि उपस्थित सर्वांवर कायमचा प्रभाव टाकला. 'द ट्यूनिंग फोल्क्स' या डॉक्टरांच्या प्रतिभावान गटाच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या संगीतमय कार्यक्रमाने संध्याकाळ आणखी उंचावली, ज्यांनी त्यांच्या भावपूर्ण सुरांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरटीएन झैनाब पटेल यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रोजेक्ट टीमने केलेल्या अथक परिश्रमाबद्दल आणि समर्पणाबद्दल सर्वच स्तरातून विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# ठाणे घोडबंदर रस्ता जानेवारी २०२६ मध्ये वाहतूक कोंडीमुक्त होणार

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**

गायमुख घाटाचे पुनर्पुष्ठीकरण, घोडबंदर सेवा रस्ता जोडणी, अमृत जलवाहिनी टाकणे आणि महावितरणच्या वाहिन्यांचे स्थलांतरण ही सर्व कामे पूर्ण होऊन नवीन वर्षात जानेवारी २०२६मध्ये घोडबंदर रस्ता पूर्णपणे वाहतूक कोंडीमुक्त होईल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी केले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांबाबत आढावा बैठक सोमवारी आयोजित करण्यात आली होती. ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. अरविंद पेंडसे सभागृहात झालेल्या या बैठकीस, महापालिका आयुक्त सौरभ राव, एमएमआरडीएचे सह महानगर आयुक्त आस्तिक कुमार पाण्ड्ये, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, पोलीस उपायुक्त (वाहतुक)




पंकज शिरसाट, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांच्यासह महापालिका, एमएमआरडीए, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, म्हाडा आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जस्टिस फॉर घोडबंदर रोड यांचे प्रतिनिधीही या बैठकीत सहभागी झाले होते. घोडबंदर रोडवरील विविध समस्यांबाबत जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींनी या बैठकीत सादरीकरण केले. त्याचा आढावा घेतल्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एमएमआरडीए, महापालिका, मेट्रो आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून रस्त्यावरील कामांच्या स्थितीची माहिती घेतली. गायमुख घाटातील ठाणे महापालिका हद्दीतील रस्त्यांच्या पुर्नपुष्ठीकरणाचे काम वाहतूक पोलिसांशी समन्वय साधून केले जाणार आहे. त्याचवेळी, जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींनी सुचवल्याप्रमाणे घोडबंदर रस्त्यावरील सर्व उड्डाणपुलावरील रस्त्याची डागडुजी, पुर्नपुष्ठीकरण एकाचवेळी हाती घेऊन पूर्ण केले जावे, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

# डॉ.बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण दिनी रेल्वे कोच वाढवा; मुंबईत येणाऱ्या अनुयायांचा प्रवास सुकर होईल

## उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची रेल्वे मंत्र्यांना पत्र पाठवत विनंती

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



Anna Dadu Bansode
Dy. Speaker
Maharashtra Legislative Assembly

To,
Shri Ashwini Vaishnawji,
Hon'ble Minister of Railways,
Government of India, Rail Bhavan, New Delhi – 110001

Subject: Request to Attach Additional Coaches to Trains Arriving in Mumbai on the Occasion of Mahaparinirvan Diwas of Dr. B. R. Ambedkar

Respected Shri Vaishnawji

I write to bring to your kind attention the pressing need for enhanced railway services in view of the upcoming Mahaparinirvan Diwas of Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar, observed on 6th December every year at Chaityabhoomi, Dadar, Mumbai.

Each year, lakhs of followers from all corners of India travel to Mumbai to pay homage to the architect of the Indian Constitution. Given the massive influx of people, there is a significant rise in the demand for railway travel to and from Mumbai during this period. Therefore, I humbly request the Ministry of Railways to kindly arrange for additional coaches 5 days prior to 6th December and 5 days after 6th December to be attached to trains arriving in Mumbai.

This arrangement will greatly ease the travel burden on devotees and ensure a smoother and safer experience for the passengers, many of whom come from economically and socially disadvantaged backgrounds.

Your positive action in this regard will be a meaningful tribute to the legacy of Dr. Babasaheb Ambedkar and a great service to the people who deeply revere him.

Thank you for your consideration.

With regards,

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी दादर येथे पोहोचण्यासाठी देशभरातून येणाऱ्या अनुयायांच्या प्रवासाची दरवर्षी गैरसोय होत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित झालेल्या अनुयायांच्या प्रवासाची गैरसोय होऊ नये यासाठी ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनाच्या ५ दिवस आधी येणाऱ्या आणि ६ डिसेंबरनंतर ५ दिवसांनी मुंबईतून जाणाऱ्या रेल्वे गाड्यांना अतिरिक्त कोच जोडण्याची व्यवस्था करावी अशी विनंती विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी थेट केंद्रीत रेल्वे मंत्र्यांकडे केली आहे. उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र पाठवत ही विनंती केली आहे.भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी ६ डिसेंबरला येणाऱ्या लाखो अनुयायांमुळे मुंबईत रेल्वेवरील वाढता ताण लक्षात घेता मुंबईत दाखल होणाऱ्या रेल्वे सेवांमध्ये अधिक वाढ करण्याची गरज आहे. लोकांची प्रचंड गर्दी पाहता ये-जा करण्यासाठी रेल्वे प्रवासाच्या मागणीत लक्षणीय वाढ झाली आहे असे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी रेल्वे मंत्र्यांना दिलेल्या पत्रात म्हंटले आहे. देशभरातील अनुयायी डॉ.बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी महापरिनिर्वाण दिनाच्या आधीच मुंबईत दाखल झाला तर मुंबईतील लोकल सेवेवरील भार कमी होईल, प्रवासाची गैरसोय होणार नाही.गर्दी न करता महापरिनिर्वाण दिनाच्या नंतर या अनुयांना सुखरुप प्रवास करता येणे शक्य होईल असे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे म्हणाले.

## प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा निर्धार

# मागण्या न निकाली निघाल्यास हिवाळी अधिवेशनात ‘महामोर्चा’

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर, कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभर निदर्शने करण्यात येणार आहेत. मंगळवारी (दि.११ नोव्हेंबर) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक तासांचे निदर्शन करण्यात येणार असून, सर्व कर्मचाऱ्यांना या निदर्शनात सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन समितीचे जिल्हा निमंत्रक रावसाहेब निमसे व जिल्हा सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी केले आहे.पूर्वनियोजित ११ नोव्हेंबरचा लाक्षणिक संप निवडणूक आचारसंहितेमुळे स्थगित ठेवण्यात आला असला, तरी आंदोलनाची दिशा आणि तिव्रता कायम ठेवण्यात येणार आहे, असे समन्वय समितीचे राज्य निमंत्रक विश्वास काटकर यांनी स्पष्ट केले आहे. दि. ५ नोव्हेंबर रोजी मध्यवर्ती संघटनेची राज्य कार्यकारिणी सभा घेऊन नवीन ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. या ठरावानुसार आता दि. ११ नोव्हेंबर रोजी सर्व सरकारी कार्यालयासमोर एक तासाचे निदर्शने करण्यात येणार आहे.समन्वय समितीने स्पष्ट केले की, बदलत्या परिस्थितीत आंदोलनाचे स्वरूप बदलणे म्हणजे आंदोलन मागे घेणे नव्हे. संघशक्तीची धग कायम ठेवून पुढील टप्प्यात अधिक प्रभावी आंदोलन उभारले जाईल. समन्वय समितीने शासनाकडे सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अधिसूचना त्वरित जाहीर करावी, दहा वर्षांपासून कार्यरत सर्व कंत्राटी, रोजंदारी, अंशकालीन कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करावे, प्रतीक्षा यादीतील पात्र उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती द्यावी, मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर दोन महिन्यांतून एकदा चर्चासत्राचे व्यासपीठ उपलब्ध करावे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यात यावे, सर्व कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करावी, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवावी, २००५ पूर्वी व नंतर नियुक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, १०-२०-३० वर्षांच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करावी, १० लिपिक संवर्गातील पदोन्नती व वेतनवाढीचे धोरण सुधारावे, ११ पीएफआरडीए कायदा रद्द करून निधी राज्य सरकारकडे परत आणावा, १२ सरकारी कर्मचाऱ्यांवरील हिंसेसाठी कलम ३५३ अजामिनपात्र करावे, १३ रिक्त पदे तातडीने भरावीत, सेवाभरती नियम व आकृतीबंधांना शासन मान्यता द्यावी, १४ नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) व १५ मार्च २०२४ च्या संचमान्यतेच्या आदेशाचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

समन्वय समितीने डिसेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे महामोर्चा काढण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ११ नोव्हेंबरनंतर समितीची राज्यस्तरीय बैठक घेऊन पुढील रणनीती निश्चित केली जाणार आहे. सर्व जिल्ह्यांतील सरकारी, निमसरकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन या निदर्शनात सहभाग घेऊन आंदोलन यशस्वी करण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे.



# शिवसेनेचा निर्धार-गेवराई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत सक्षम उमेदवार देऊ आणि निवडून आणू-शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले



**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे गट  पक्ष निर्धाराने निवडणुक लढविणार असून, गेवराई शहरातील नागरीकांसमोर नगराध्यक्ष पदासाठी एक सक्षम पर्याय आम्ही देणार आहोत. नगराध्यक्ष पदा साठी अनेक कर्तृत्ववान महिला पक्षामध्ये आहेत. त्यापैकी, पक्षाच्या वरीष्ठ पातळीवर लवकरच निर्णय होईल आणि एक चांगला उमेदवार आम्ही जनतेसमोर ऊभा करू, असा ठाम विश्वास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चंद्रकांत अप्पा नवले यांनी येथे व्यक्त केला आहे. दरम्यान, शिवसेनेचे तालुकाप्रमुख उद्धव मडके, शहर प्रमुख महाजन यांनीही नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करून, समविचारी पक्षाला सोबत घेऊन चांगला उमेदवार देऊ, गेवराई शहराच्या विकासात शिवसेना इमानदारी भूमिका पार पाडणार असल्याचा निर्धार करून ; शहरातील मतदार शिवसेनेचे प्रमुख नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे गेवराई नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत आम्हाला यश  मिळवून देतील असा विश्वास व्यक्त केला आहे.

आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने उमेदवार निवडीची प्रक्रिया मंगळवार ता. ११ रोजी पार पडली आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या  इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ११. ११. २०२५ रोजी मोंढा नाका गेवराई येथे शहर प्रमुख मुकेश महाजन यांच्या संपर्क कार्यालयामध्ये घेण्यात आल्या. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले, तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके, शहरप्रमुख मुकेश महाजन व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. जिल्हाप्रमुख  नवले अप्पा म्हणाले की, प्रत्येक प्रभागातून अभ्यासू, नेतृत्वसक्षम, लोकाभिमुख, विकासाभिमुख आण समाजकार्यासाठी जास्तीत जास्त वेळ देणारा चेहरा पुढे आणण्यावर आमचा भर राहणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडल्याचे ड. चंद्रकांत नवले यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, नगरपालिका निवडणुका या केवळ राजकीय स्पर्धा नसून शहराच्या भविष्यास आकार देणारी महत्त्वपूर्ण संस्था आहे. शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, वाहतूक, बाजारव्यवस्था व नागरिकांचे कल्याण, यांसारख्या जीवनावश्यक कामांची जबाबदारी नगरपालिका व्यवस्थेवर असते. त्यामुळे सक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे अत्यावश्यक असल्याचेही जिल्हाप्रमुख  ड. चंद्रकांत नवले यांनी सांगितले. शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव मडके यांनी गेवराई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना शहाराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून लढणार असल्याचे सांगितले. जुन्या शहराचा विकास हाच आमचा ध्यास असून, प्रस्थापित नेत्यांच्या विरोधात ठाम पणे, मोठ्या निर्धाराने गेवराई नगर परिषदेची निवडणूक लढविणार असल्याचा विश्वास शहर प्रमुख मुकेश महाजन यांनी व्यक्त केला आहे.यावेळी उपजिल्हाप्रमुख . नारायण शिंदे, ओबीसी सेलचे तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर, विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, ओबीसी सेलचे तालुका संपर्कप्रमुख नागराज तलवाडे, युवा सेना तालुकाप्रमुख बिभीषण मोघे, शेतकरी सेना जिल्हाप्रमुख संदीप सोनवणे, शिवसेना नेते राजेंद्र डाके पाटील, गणेश पवार, विक्रम भोसले, दत्तू नाना येवले, शिवराज उगले, अभय भांडवलकर, नागेश मिटे,अंकुश गिरी संजय नवले, उमेश शिंदे आदी उपस्थित होते.

# तळोदा नगर परिषद निवडणुकीची रणधुमाळी! नगराध्यक्षपदासाठी भाजपमध्ये त्रिकोणी 'चौरस'

## युती की स्वबळ? शिंदे-सेनेच्या भूमिकेकडे लक्ष!

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

राज्यातील नगरपालिका निवडणुकांचे बिगुल वाजताच तळोदा नगर परिषदेच्या निवडणुकीत उमेदवारीसाठी इच्छुकांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. तळोदा येथे भाजप, शिंदे सेना आणि काँग्रेस हे तीन प्रमुख दावेदार पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत, तर अपक्षांची तयारीही जोरात आहे. पक्षाचा बहुप्रतिक्षित 'एबी फॉर्म' कोणाला मिळणार, याकडे सर्वसामान्य जनता आणि पक्ष कार्यकर्त्यांच्या नजरा लागल्या आहेत. नगर परिषदेच्या नगराध्यक्षपद आणि नगरसेवक पदाच्या निवडणुकीसाठी भाजपकडून इच्छुकांची मोठी भाऊगर्दी झाली आहे. विशेषतः नगराध्यक्षपदासाठी पक्षात त्रिकुटामध्ये प्रमुख चुरस दिसून येत आहे: माजी नगराध्यक्ष अजय परदेशी प्रदेश कार्यकारिणी सदस्य शशिकांत वाणी



अजय परदेशी



डॉ.शशिकांत वाणी



जितेंद्र सूर्यवंशी

माजी नगरसेवक जितेंद्र सूर्यवंशी या तिघांपैकी पक्ष कोणावर विश्वास टाकतो, याकडे सगळ्यांचे लक्ष लागून आहे. नुकत्याच तळोदा येथे भाजपच्या वतीने इच्छुकांच्या मुलाखती पार पडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार राजेश पाडवी यांच्या भूमिकेकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे, कारण त्यांच्या मर्जीनुसारच नगराध्यक्षपदाचा उमेदवार जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.  दुसरीकडे, शिंदे सेनेने अद्याप आपला उमेदवार अधिकृतपणे जाहीर केला नसला तरी, एका तरुण चेहऱ्याच्या माध्यमातून प्रचाराला सुरुवात केली आहे. शिंदे सेनेचे आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी युतीबाबतची भूमिका स्पष्ट केली आहे. आमची बोलणी सुरू आहेत. योग्य वाटाघाटी झाल्यास युती पक्की होईल, अन्यथा आम्ही स्वतंत्रपणे निवडणूक लढवू, असे त्यांनी जाहीर केले आहे. युती होणार की नाही, यावर तळोद्याचे राजकीय चित्र अवलंबून आहे.  काँग्रेस पक्षाने देखील उमेदवारीसाठी मुलाखती घेतल्या आहेत. मात्र, या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला तळोद्यात नवसंजीवनी प्राप्त करण्यासाठी मोठी मेहनत घ्यावी लागणार आहे. या दृष्टीने पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते कामाला लागले आहेत. सध्या सर्वच इच्छुक उमेदवार उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांच्या जुळवाजुळवीमध्ये दंग आहेत, त्यामुळे अजूनही अर्ज दाखल झालेले नाहीत. शेवटी, तो पक्ष काँग्रेस असो, भाजप, शिंदे सेना किंवा अपक्ष असो; उमेदवारी कोणाला मिळते, याच एका निष्कर्षाकडे सर्वांच्या नजरा लागून आहेत.

# पहिल्या पत्नीने जाब विचारला म्हणुन तिच्यावर 'वस्तऱ्याने' वार केला केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**




केज येथील क्रांतीनगर भागात राहणाऱ्या पती-पत्नी मधील किरकोळ वाद विकोपाला गेल्यामुळे,पहिली पत्नी माहेरी असताना पतीने अवघ्या चार महिन्यांत दुसऱ्या महिलेसोबत लग्न केल्याची धक्कादायक घटना केज येथे घडली असून.पहिल्या पत्नीने आपल्या पतीला याचा जाब विचारला असता, पतीने तिच्या कपाळावर धारदार वस्तऱ्याने वार करून इतर तिघां सोबत संगनमत करून पहिल्या पत्नीला बेदम मारहाण केल्या प्रकरणी पहिल्या पत्नीच्या फिर्यादीवरून  पती विरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद झाला आहे.केज येथील क्रांतीनगर भागात राहणारे सतीश लांडगे आणि त्यांची पत्नी अंजना लांडगे यांच्यात चार महिन्यांपूर्वी झालेल्या किरकोळ भांडणामुळे अंजना लांडगे या क्रांतीनगर येथील मुलाच्या घरी राहत होत्या.याच दरम्यान, सतीश लांडगे यांनी दुसऱ्या महिलेशी लग्न करून तिच्यासोबत राजरोस राहण्यास सुरुवात केली.नवऱ्याच्या दुसऱ्या लग्नाची माहिती मिळताच अंजना लांडगे यांनी याबाबत आपल्या पतीकडे विचारणा केली, व सामान आणि घर बांधण्यासाठी दिलेले २ लाख रुपये परत मागितले असता, सतीश लांडगे यांनी त्यांना घराबाहेर हाकलून दिले. अंजना लांडगे यांचा मुलगा आणि सून दि.७ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे आठ वाजता ऊस तोडणीसाठी साखर कारखान्यावर गेले असताना,अंजना लांडगे या घरी एकट्या असल्याच्या संधीचा फायदा घेऊन,पती सतीश लांडगे याच्यासह अलका रोहीदास मुजमुले,किरण रोहीदास मुजमुले आणि कुणाल रोहीदास मुजमुले हे चौघेजण त्यांच्या  घरात घुसले.व त्यांनी अंजना लांडगे यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली.पती सतीश लांडगे यानी क्रूरतेची परिसीमा गाठत अंजना लांडगे यांच्या कपाळावर धारदार वस्तऱ्याने वार करून त्यांना गंभीर जखमी केले. या घटनेनंतर अंजना लांडगे यांच्या फिर्यादी वरून पती सतीश लांडगे, अलका मुजमुले,किरण मुजमुले आणि कुणाल मुजमुले या चौघांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार त्रिंबक सोपने हे पुढील तपास करीत आहेत.

# अँड.बापुजी जाधव यांचे शिवसेना (शिंदे गट) शेतकरी आघाडी बीड जिल्हाप्रमुखपदी निवड



**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे गटाच्या शेतकरी आघाडीच्या बीड जिल्हाप्रमुखपदी अँड. बापुजी जाधव यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून हार्दिक स्वागत करण्यात आले. यावेळी भारतीय जनता मजूर संघाचे राष्ट्रीय सचिव तथा नमो संघाचे प्रदेशाध्यक्ष भाऊसाहेब घोडके,ऊसतोड कामगार कृती समितीचे निमंत्रक तसेच लेक लाडकी अभियानाचे प्रणेते बाजीराव ढाकणे आणि दैनिक आत्ताच एक्स्प्रेसचे बीड जिल्हा प्रतिनिधी किशोर देवा कुलकर्णी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.शेतकरी हक्क,प्रश्न आणि त्यांच्या न्यायासाठी आवाज बुलंद करण्याचे काम पुढे अधिक जोमाने सुरू राहील,असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.तसेच जिल्ह्यातील शेतकरी संघटनात्मक दृष्ट्या अधिक सक्षम व्हाव्यात यासाठी नियोजनबद्धरीत्या काम करण्याचा निर्धार अँड. जाधव यांनी व्यक्त केला.कार्यक्रमात मान्यवरांनी जाधव यांना शुभेच्छा देत आगामी भूमिका प्रभावी पणे पार पाडण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. तसेच पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शाश्वत शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रक्रिया उद्योगाची कास-'किसान गप्पा गोष्टी' चर्चासत्रातून शेतकऱ्यांना नवी दिशा!

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**




आधुनिक शेती पद्धती, रब्बी हंगामाचे नियोजन आणि शासनाच्या योजनांची माहिती थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने तळोदा तालुक्यात 'किसान गप्पा गोष्टी' या महत्त्वपूर्ण चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. जय बलराम शेतकरी गट, तळवे आणि तालुका कृषी कार्यालय, तळोदा यांच्या संयुक्त विद्यमाने सलसाडी येथील प्रगतिशील शेतकरी विजय सोनवणे यांच्या शेतावर हा उपक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या पूजनाने झाली. विजय  सोनवणे यांनी प्रास्ताविक सादर करून शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले. या चर्चासत्रात कृषी विभागाचे अधिकारी, कृषी विज्ञान केंद्राचे तज्ञ आणि परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.तळोदा तालुका कृषी अधिकारी मीनाक्षी वळवी  यांनी आपल्या मार्गदर्शनात स्पष्ट केले की, आजच्या काळात वैज्ञानिक शेती आणि शासकीय योजनांचा योग्य वापर हेच शेतकऱ्यांच्या प्रगतीचे प्रमुख साधन आहे. कृषी विभागाने उपलब्ध केलेल्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी माहितीपूर्ण राहणे आणि तंत्रज्ञान आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कृषी विज्ञान केंद्र, कोळदा राजेंद्र दहातोंडे यांनी शेतकऱ्यांना उत्पादक नव्हे, तर उद्योजक बनण्याचा कानमंत्र दिला. त्यांनी सांगितले की, शेती उत्पादनाला मूल्यवर्धन देण्यासाठी प्रक्रिया उद्योगाची दिशा घेणे गरजेचे आहे. केळी, मिरची, पपई यांसारख्या पिकांवर आधारित लघुउद्योगांद्वारे शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता येईल.यावेळी सोमावल-१ उपकृषी अधिकारी विकास अहिराव, आत्मा प्रमुख विपुल चौधरी, प्रक्षेत्र व्यवस्थापक राजेश भावसार, तळवे सरपंच मोग्या भिल, आणि ड. उमेश सोनवणे यांच्यासह तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ड. उमेश सोनवणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर छोटू  कलाल यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# गौणखनिज उत्खनन नियंत्रणासाठी 'महाखनिज प्रणाली'चा प्रभावी वापर करा: जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांचे निर्देश

## अवैध उत्खननमुक्त जिल्हा करण्यावर भर; महसूल, पोलीस आणि RTO विभागाच्या समन्वयासाठी प्रशिक्षण सत्र संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यामध्ये गौणखनिज उत्खनन आणि वाहतुकीवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने मोठी मोहीम हाती घेतली आहे. सोमवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली गौणखनिज विषयक महाखनिज प्रणाली  प्रशिक्षण व आढावा बैठक घेण्यात आली.

या महत्त्वाच्या बैठकीला जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, आर टी ओ अधिकारी, मंडळ अधिकारी, महसूल अधिकारी व तलाठी हे व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते. बैठकीत गौणखनिज नियंत्रणाच्या तांत्रिक आणि अंमलबजावणीच्या पैलूंवर सखोल चर्चा झाली.



मित्ताली सेठी यांनी उत्खनन नियंत्रणासंदर्भात प्रशासनाला स्पष्ट आणि कडक निर्देश दिले. त्यांनी नमूद केले की, नंदुरबार जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये होत असलेल्या गौणखनिज उत्खनन आणि वाहतुकीवर प्रभावी देखरेख ठेवण्यासाठी महाखनिज प्रणालीचा पुरेपूर वापर करण्यात यावा. प्रत्येक वाहन, उत्खनन स्थळ आणि वाहतूक मार्गांची काटेकोर तपासणी व्हावी. अवैध वाहतूक आढळल्यास त्वरित दंडात्मक कारवाई केली जावी.डॉ. सेठी यांनी पुढे या प्रणालीचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, महाखनिज प्रणाली प्रशासनाला तांत्रिक सक्षमतेसह पारदर्शकतेकडे घेऊन जाईल. यामुळे महसूल गळती थांबेल आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल. त्यांनी प्रशासनाच्या सर्व स्तरांवर या प्रणालीच्या वापरासाठी तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077